# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक–रोड ,नाशिक

☎ : 2461479, Fax : 2455301 ई–मेल:-ronashik.dte@gmail.com.

**Website :-www.dtensk.org**


---

**जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/** 1741 **दिनांक :** 31 OCT 2011

**<u>परिपत्रक</u>**

विषय :-सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशित विदयार्थ्यांच्या गुणवत्ता यादी पडताळणी/मान्यतेबाबत.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नाशिक या कार्यालयाच्या अधिपत्याखालील अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अंतर्गत असलेल्या व नसलेल्या तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी स्तरावरील संस्थाचे प्राचार्य/संचालक यांना सुचित करण्यात येते की, सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षातील त्यांच्या संस्थेतील प्रवेशित विदयार्थ्यांच्या गुणवत्ता यादयाची पडताळणी/मान्यता देण्याबाबतची कार्यवाही या विभागीय कार्यालयामार्फत पूर्ण करण्यात आलेली आहे. तथापी अदयापपर्यत ज्या संस्थामधील प्रवेशित विदयार्थ्यांची गुणवत्ता यादी पडताळणी/मान्यता देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली नाही अशा संस्थानी सदरची कार्यवाही **दिं.५.११.२०११** पर्यत पूर्ण करुन घ्यावी.दिं.५.११.२०११ नंतर प्राप्त झालेल्या प्रवशित विदयार्थ्यांच्या गुणवत्ता यादीची पडताळणी करण्यात येणार नाही.ज्या संस्थेमधील सन २०११-१२ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशित विदयार्थ्यांची गुणवत्ता यादी पडताळणी /मान्यतेची कार्यवाही पूर्ण करुन घेतलेली नाही त्यांच्या यादया दिं.५.११.२०११ नंतर तपासल्या जाणार नाही याची नोंद संस्थाप्रमुखानी घ्यावी.प्रवेशित विदयार्थ्यांचे अंतिम प्रवेश,नोंदणी,पात्रता इ.बाबत तसेच इतर कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक नुकसान/अडचण निर्माण झाल्यास या करिता संस्थाप्रमुख स्वत: जबाबदार राहतील.

(**दि.रा.नंदनवार**)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.

**प्रति,**

सर्व प्राचार्य/संचालक,

अशासकीय अनुदानित,विनाअनुदानित अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/हॉटेल मॅनेजमेंट,एमबीए/एमएमएस व एमसीए अभ्यासक्रमाच्या पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,नाशिक विभाग